आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र – रात्री ८ वा. ५ मिनीटांनी

३ ऑक्टोबर २०२३ – मंगळवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तेंलगणामधे ८ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी

- महाराष्ट्रातल्या सव्वा २ हजारांहून अधिक ग्रामपंचातींमध्ये सार्वत्रिक निवडणुकांसाठी ५ नोव्हेंबरला मतदान

- प्रकाशाच्या अ◌ॅटोसेकंद प्लसविषयी केलेल्या संशोधनासाठी ३ शास्त्रज्ञांना यंदाचा भौतिकशास्त्रातला नोबेल पुरस्कार जाहीर

- नांदेडमधल्या शासकीय रुग्णालयातल्या गेल्या ३ दिवसातल्या मृतांची संख्या ३१ वर/ या सर्व मृत्यूंबाबत चौकशी करण्याची वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांची घोषणा

**आणि**

- आशियाई क्रीडा स्पर्धेत आज भारताला दोन सुवर्ण, दोन रौप्य, आणि चार  कांस्य पदकांची कमाई

**<><><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज तेंलगणामधे ८ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या प्रकल्पांचं लोकार्पण आणि पायाभरणी केली त्यांनी आज मनोहराबाद ते सिद्धीपेट, या नव्या रेल्वे मार्गाचं, तसंच धर्माबाद

ते मनोहराबाद आणि मेहबूबनगर ते कुर्नूल विद्युतीकरण प्रकल्पांचं लोकार्पण केलं. प्रधानमंत्र्यांनी रामागुंडममधे राष्ट्रीय औष्णिक विद्युत महामंडळाच्या तेंलगणा सुपरथर्मल पॉवरप्रोजेक्टच्या पहिल्या टप्प्यातलं ८०० मेगावॅटचं पहिलं एककही राष्ट्राला समर्पित केलं. २० जिल्हा मुख्यालयांमधे प्रधानमंत्री आयुष्यमान भारत आरोग्य मिशनअंतर्गत ५० खाटांच्या आधुनिक ब्लॉकची पायाभरणी त्यांनी केली.

<><><><><>

महाराष्ट्रातल्या सुमारे 2 हजार 359 ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी, तसंच 2 हजार 950 सदस्यपदाच्या; तर 130 सरपंचांच्या रिक्तपदांच्या पोटनिवणुकांसाठी, येत्या 5 नोव्हेंबरला मतदान होणार आहे. राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी आज मुंबईत ही घोषणा केली. संबंधित ग्रामपंचायतींच्या क्षेत्रात आजपासून आचारसंहिता लागू झाली आहे, असं त्यांनी सांगितलं.

उमेदवारी अर्ज येत्या १६ ते २० तारखेदरम्यान दाखल करता येतील. येत्या २३ तारखेला छाननी होईल. येत्या २५ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज मागं घेता येतील. त्याच दिवशी निवडणूक चिन्हांचं वाटप होईल. ५ नोव्हेंबरला सकाळी साडेसात ते संध्याकाळी साडेपाच या वेळेत मतदान, तर मतमोजणी ६ नोव्हेंबरला होईल. गडचिरोली आणि गोंदिया या नक्षलग्रस्त भागात सकाळी साडेसात ते दुपारी ३ वाजेपर्यंतच मतदानाची वेळ असेल. तिथं ७ नोव्हेंबरला मतमोजणी होईल.

<><><><><>

गेल्या महिन्यात सुरु झालेल्या आयुष्मान भव मोहिमेअंतर्गत आता पर्यंत सुमारे 64 हजार लोकांनी आपले अवयव दान करण्याची शपथ घेतली आहे. ही मोहीम 17 सप्टेंबर ते 2 ऑक्टोबर या कालावधीत 'सेवा पंधरवडा ' म्हणून राबवली गेली. केंद्रीय आरोग्य मंत्री मनसुख मांडविया यांनीही अवयवदानासाठी नोंदणी केली आहे. या मोहिमेअंतर्गत सुमारे 2 लाख 70 हजार आरोग्य मेळावे आयोजित केले गेले होते. यामध्ये एक कोटी 61 लाखांहून अधिक लोकांनी लाभ घेतल्याची माहिती त्यांनी दिली. तसंच या मोहिमेत 14 हजार 157 रक्तदान शिबिरे घेण्यात आली असून त्यामध्ये सुमारे दोन लाख 28 हजार युनिटस रक्त संकलित करण्यात आलं आहे.

<><><><><>

प्रकाशाच्या अ◌ॅटोसेकंद प्लसविषयी केलेल्या संशोधनासाठी ३ शास्त्रज्ञांना यंदाचा भौतिकशास्त्रातला नोबेल पुरस्कार जाहीर झाला आहे. अमेरिकेचे पियरे अगोस्टिनी, जर्मनीचे फेरेंक क्रॉझ आणि स्वीडनचे ॲन ल्युलिअर या शास्त्रज्ञांना हा पुरस्कार मिळाला आहे. या पुरस्काराची घोषणा आज स्वीडनच्या रॉयल स्वीडिश अकादमी ऑफ सायन्सेसनं केली. अत्यंत अत्यन्त वेगवान प्रक्रिया मोजण्यासाठी प्रकाशाच्या लहान प्लस निर्माण करण्याचा मार्ग त्यांनी या प्रयोगातून दाखवला.

<><><><><>

नांदेडमधल्या शासकीय रुग्णालयातल्या गेल्या ३ दिवसातल्या मृतांची संख्या ३१ झाली आहे. या सर्व मृत्यूंच्या कारणांची चौकशी केली जाईल, अशी माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली आहे. नांदेडचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्यासह रुग्णालयाला भेट दिल्यानंतर ते वार्ताहरांशी बोलत होते.

**बाईट - हसन मुश्रीफ**

रुग्णालयातली रिक्त पदं तत्काळ भरली जातील. स्वच्छतेचं काम बाह्ययंत्रणेमार्फत केलं जाईल, असंही ते म्हणाले. यापुढे एकही मृत्यू होणार नाही, याची काळजी घेण्याचे आदेश दिल्याचंही त्यांनी सांगितलं.

याप्रकरणी दोषींवर कारवाई केली जाईल, असं आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिलं आहे. रुग्णालयात औषधांची कमतरता नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलंय.

याप्रकरणी आरोग्यमंत्री आणि वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**<><><><><><>**

हांगझोऊ इथल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत भारताची विजयी घोडदौड कायम आहे. स्पर्धेच्या दहाव्या दिवशी भारतानं आज दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि पाच कांस्य पदकांची कमाई केली. त्यामुळे आतापर्यंत एकूण **६९**पदकं जिंकून पदक तालिकेत भारत चौथ्या स्थानावर आहे.

भालाफेकीत अन्नु राणी हिनं, तर ५ हजार मीटर शर्यतीत पारुल चौधरीनं सुवर्ण पदक पटकावलं. पुरुषांच्या डेकेथ्लॉनमधे तेजस्विन शंकरनं रौप्य पदक पटकावलं. पुरुषांच्या 800 मीटर शर्यतीत मोहम्मद अफझलं यानं रौप्यपदक जिंकलं. महिलांच्या 400 मीटर अडथळ्यांच्या शर्यतीत विथ्या रामराजनं, तर महिलांच्या 54 किलो वजनी गटाच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत प्रीती पवारनं कांस्यपदक जिंकलं. पुरुषांच्या कॅनो दुहेरी 1 हजार मीटरमध्ये, भारताच्या अर्जुन सिंग आणि सुनील सिंग सलाम यांनी कांस्यपदक जिंकलं.

मुष्टियुद्धात ९२ किलोवरच्या वजनी गटात, नरेंद्र बेरवालला कांस्यपदक मिळालं.

**<><><><><>**

नेपाळमध्ये आज झालेल्या दोन भूकंपांमुळे राजधानी दिल्लीसह देशाच्या उत्तर भागाला मोठे हादरे बसले. या भूकंपांची तीव्रता ४ पूर्णांक ६ दशांश आणि ६ पूर्णांक २ दशांश रिश्टर स्केल इतकी होती. त्याचा केंद्रबिंदू नेपाळमध्ये जमिनीखाली ५ किलोमीटरवर होता अशी माहिती राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्रानं दिली. यापैकी पहिला भूकंप आज दुपारी सव्वा दोन वाजता, आणि दुसरा भूकंप दुपारी २ वाजून ५१ मिनिटांनी झाला. यामध्ये कोणतीही हानी झाल्याचं वृत्त नाही.

**<><><><><>**

राज्याच्या नऊ जिल्ह्यांमध्ये **सोयाबीनच्या** पिकावर पडलेल्या विषाणूजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर कृषी विभाग आणि मदत आणि पुनर्वसन

विभागानं तातडीनं सोयाबीन पिकाचे पंचनामे सुरु करावेत असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज मंत्रिमंडळ बैठकीत दिले. पाऊस आणि तापमानाच्या बदलत्या स्वरूपामुळे यंदा चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, यवतमाळ, सोलापूर, लातूर, वाशिम,नांदेड या जिल्ह्यांत सोयाबीन पिकावर रोगाचा प्रादुर्भाव दिसत आहे.

**राज्यात कृषी पंप** वीज जोडण्याचं काम वेगानं पूर्ण करण्यासाठी उच्च दाब वितरण प्रणाली योजनेला ३१ मार्च २०२४ पर्यंत मुदतवाढ देण्याचा निर्णय आज मंत्रिमंडळ बैठकीत झाला.

**<><><><><>**

मानसिक आरोग्याबाबत जनजागृती निर्माण करण्यासाठी एम्स, अर्थात अखिल भारतीय वैद्यकीय विज्ञान संस्था आणि मेंटल हेल्थ फाउंडेशन इंडिया, यांनी आज नवी दिल्ली इथं देशातला सर्वात मोठा मानसिक आरोग्य महोत्सव आयोजित केला आहे.

‘मानसिक आरोग्य हा सार्वत्रिक मानवी हक्क आहे’, ही या महोत्सवाची संकल्पना आहे. कला आणि संस्कृतीशी शास्त्रीय माहितीची सांगड घालणं, हे या महोत्सवाचं उद्दिष्ट आहे.

जगभरातल्या मानसिक आरोग्याच्या समस्यांबाबत जागरूकता वाढवणं आणि मानसिक आरोग्याचं समर्थन करण्याच्या प्रयत्नांना चालना देणं हे जागतिक मानसिक आरोग्य दिनाचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजाराच्या निर्देशांकात आज ३१६ अंकांची घसरण झाली आणि तो ६५ हजार ५१२ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ११० अंकांची घसरण नोंदवत १९ हजार ५२९ अंकांवर बंद झाला.

**<><><><><><>**

गोंदिया जिल्ह्यातल्या महालगाव इथल्या जवानाचा आज हृदयविकाराच्या झटक्यानं मृत्यू झाला. मृत जवान देवीप्रसाद लिल्हारे हे सिमला इथं भारतीय सैन्य दलात हवालदार पदावर कार्यरत होते. त्यांच्या पार्थिवावर उद्या त्यांच्या मूळगावी महालगाव इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार होणार आहेत.

**//<><><><><><>//**